**पत्र**

जा.क्र.कृआ/फलो-६/प्र.क्र.२९/रासुसिंअ/मासु/५२४/२०१२
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,
पुणे-४११००५,दिनांक- २ नोव्हेंबर २०१२

**प्रति,**

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)

**विषयः**- राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियान २०१२-१३ मध्ये अंमलबजावणी बाबत मार्गदर्शक सुचना
**संदर्भः-** शासन निर्णय क्र.सूसियो-१६१२/प्र.क्र.१/४-अे,दि.२९/१०/२०१२.

सुक्ष्म सिंचन संच शेतक-यांना योग्य दरात उपलब्ध व्हावेत यासाठी जागतिक निविदा (**Global Tender**) काढण्याबाबत शासनाकडून सुचना प्राप्त झालेल्या होत्या त्यानुसार निविदा मागविण्यात आल्या व सुक्ष्म सिंचनाच्या विविध घटकांचे दर निश्चित करण्यात येवून प्रस्तावित दरास शासन मान्यता मिळणेस विनंती करण्यात आलेली होती. संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रस्तावीत दरास शासन मान्यता प्राप्त झालेली असून सुक्ष्म सिंचन संचाचे घटक निहाय मंजूर दर परिशिष्ट-१ (**Annexure-I**) मध्ये सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत. सदर दर सन २०१२-१३ वर्षासाठी कमाल विक्री किंमत (एम.आर.पी.) म्हणुन लागु राहतील. ज्या उत्पादक कंपन्यांना शासनाने सुक्ष्म सिंचन घटकासाठी निश्चित केलेली कमाल विक्री किंमत(एमआरपी) मान्य रहातील त्यांची नोंदणी कृषि आयुक्तालय स्तरावर नोंदणीबाबतच्या अटी व शर्तीनुसार करण्यात येईल. सुक्ष्म सिंचन संच बसविण्यासाठी कृषि आयुक्तालयाकडे नोंदणी केलेल्या उत्पादक कंपन्यांची नोंदणीकृत यादी नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उापलब्ध करुन देण्यात येईल तसेच कृषि विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

सुक्ष्म सिंचन घटकांचे दर कमी झाल्यामुळे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार ठिबक सिंचन संचासाठी क्षेत्रनिहाय येणा-या खर्चाचे प्रमाणक (Indicative Cost) परिशिष्ट-२ (**Annexure-II**) व पोर्टेबल स्प्रिंकलर व रेनगन यांचे क्षेत्रनिहाय खर्चाचे प्रमाणक परिशिष्ट-३ (**Annexure-III**) मध्ये देण्यात आलेले आहे. अनुदानाची परिगणना करण्यासाठी सदरील परिशिष्टाचा वापर करावा.

www.mahaagri.gov.in

राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियानांतर्गत सन-२०१०-११ मध्ये योजना अंमलबजावणीसाठी या विभागाचे पत्र क्रमांक सीआरएस-०८-१०-११/मासू/फलो-६,दि.३०/०३/२०११ नुसार सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या मार्गदर्शक सूचना राष्ट्रीय सूक्ष्म सिंचना योजना सन-२०१२-१३ मध्ये राबविण्यासाठी लागू राहतील. सन-२०१०-११ मधील मार्गदर्शक सूचनांस पूरक मार्गदर्शक सूचना पुढील प्रमाणे देण्यात येत आहेत.

अ) मार्गदर्शक सूचनातील सूचना क्र.९ मध्ये अनुदान प्रस्तावाबाबतच्या कार्यपध्दती संदर्भात सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. शासनाने सन २०१२-१३ मध्ये सुक्ष्म सिंचन योजना राबविण्यासाठी संगणक प्रणालीचा (ऑनलाईन ई-ठिबक) अवलंब करण्याचे निश्चित केले असल्यामुळे, संगणक प्रणाली (ऑनलाईन ई-ठिबक) कार्यपध्दतीचा अवलंब करण्याबाबत पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) सुक्ष्म सिंचन योजनेचा सन २०१२-१३ साठीचा जिल्हानिहाय भौतिक व आर्थिक कार्यक्रमास शासनाकडून मान्यता प्राप्त होताच कळविण्यात येईल.

२) जिल्हयास दिलेल्या उद्दिष्ठानुसार ऑनलाईन अर्ज केलेल्या शेतक-यांना क्रमवारीनुसार तालुका कृषि अधिकारी पुर्व संमती देतील.

३) पुर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर शेतक-यांना त्यांच्या पसंतीप्रमाणे नोंदणीकृत कंपनीच्या वितरकाकडुन सुक्ष्म सिंचन संच बसवुन घेतील.

४) संच बसविल्यानंतर अनुदानासाठी प्रस्ताव लाभार्थि शेतकरी तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करतील. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तालुका कृषि अधिकारी हे मंडल कृषि अधिकारी यांचे मार्फत त्वरीत मोका तपासणी करुन घेतील.

५) मोका तपासणीबाबतची नोंद संगणक अज्ञावलीमध्ये तालुका स्तरावर करण्यात येवून प्रस्तावाची छाननी करण्यात येईल व अनुदानाची परिगणना करुन ऑनलाईन प्रस्ताव उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे मंजूरीसाठी सादर करतील.

६) उपविभागीय कृषि अधिकारी त्यांचे स्तरावर प्रस्तावास मंजुरी देऊन अनुदान अदा करण्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे सादर करतील.

७) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे स्तरावरुन अनुदान शेतक-यांचे बँक खात्यावर जमा करण्यात येईल.

www.mahaagri.gov.in

ब) केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना सन २०१२-१३ मध्ये राबविण्याबाबतच्या शासन निर्णय क्र.सुसिंयो-२०१२/प्र.क्र.१०९/४अे, मुंबई-३२, दिनांक ८ऑक्टोंबर २०१२ नुसार मंडळ कृषि अधिकारी १०० टक्के,तालुका कृषि अधिकारी २५ टक्के,उपविभागीय कृषि अधिकारी ५ टक्के,जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी प्रतिमाह ५ संच व विभागीय कृषि सहसंचालक यांनी ०.५ टक्के तपासणी करण्यात यावी. तद्नंतर केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये नमूद केलेल्या सिपेट या संस्थेकडून प्रस्तावांचे १ टक्का प्रमाणात मुल्यांकन करण्यात येणार आहे.

क) अनुदानाची परिगणना करतांना देयकानुसार येणारी रक्कम व खर्चाचे प्रमाणक (ठिबकसाठी परिशिष्ट-२ व तुषार साठी **परिशिष्ट-३)** यापैकी जी रक्कम कमी असेल ती अनूदानासाठी घेण्यात यावी व त्यानुसार केंद्र शासनाच्या सूचनांप्रमाणे अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांसाठी ६० टक्के व बहूभूधारक शेतक-यांसाठी ५० टक्के अनुदान अदा करण्यात यावे.

ड) सुक्ष्म सिंचन योजना सन २०१२-१३ मध्ये बँकेमार्फत राबविण्यासंदर्भात राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांनी सहमती दर्शविलेली असून याबाबत खालील प्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

1) तालुका कृषि अधिकारी यांचेकडून सुक्ष्म सिंचन संच बसविण्यासाठी पुर्वसंमत्ती प्राप्त झाल्यानंतर शेतकरी त्यांचे पसंतीप्रमाणे उत्पादक कंपनीचे वितरकाकडून शेत परिस्थितीनुसार सुक्ष्म सिंचन संचासाठी येणा-या खर्चाचे दरपत्रकासह कर्जप्रकरणसाठी आवश्यक प्रस्ताव पसंतीच्या बँकेकडे कर्ज मंजूरीसाठी सादर करतील.

2) सुक्ष्म सिंचन संचासाठीचा प्रस्ताव शेतक-याकडून प्राप्त झाल्यानंतर बँकेमार्फत प्रस्तावाची छाननी करुन बँक कर्ज मंजूरीबाबत हमीपत्र शेतक-यास देईल.

3) हमीपत्र प्राप्त झाल्यानंतर लाभार्थी शेतकरी, उत्पादक कंपनीकडून सुक्ष्म सिंचन संच बसविण्यासाठी पूर्वसंमत्ती तपशिलानुसार प्रत्यक्ष शेतावर संच बसवून घेतील.

4) लाभार्थी शेतकरी संच बसविल्यानंतर अनुदानासाठी प्रस्ताव तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करतील. तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी व बँक प्रतिनिधी यांचेमार्फत संयुक्त मोका तपासणी करुन घेतील.

5) संयुक्त मोका तपासणीच्या अहवालानुसार नोंद घेवून तालुका कृषि अधिकारी अनुदान अदायगीबाबत विहित ऑनलाईन कार्यपध्दतीनुसार प्रस्ताव मंजूरीस्तव उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे सादर करतील तसेच उत्पादक कंपनी यांना अदा करावयाच्या कर्ज रक्कमेबाबत बँकेस प्रमाणपत्र देतील.

www.mahaagri.gov.in

6) प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर बँक कर्ज रकमेचा धनादेश शेतक-यामार्फत सबंधित सुक्ष्म सिंचन कंपनीस अदा करील.

7) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्यामार्फत अनुदानाची रक्कम शेतक-यांच्या सबंधित बँकेच्या कर्ज खात्यावर जमा करतील.

उपरोक्तप्रमाणे मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करण्यात यावा.

**सोबत- वरीलप्रमाणे.**

02/11/2012

आयुक्त कृषि
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रतः-**

1. मा.अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) कृषि व पदुम विभाग,मंत्रालय विस्तार, मुबंई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. कृषि उपसंचालक (आयुक्त कक्ष),कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीस्तव सादर.
3. विभागीय कृषि सहसंचालक, सर्व यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरीता.
4. सर्व सूक्ष्म सिंचन उत्पादक यांना माहितीसाठी.

www.mahaagri.gov